ePaper
|| वर्ष - 8 । अंक - 255 || UDYAM-MH-26-0158827 ||
महाईन्यूज ™
www.mahaenews.com | रविवार, दि. 6 एप्रिल 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## करुणा शर्मांची कागदपत्रे ठरली टर्निंग पॉइंट, धनंजय मुंडे यांना धक्का, पोटगी देण्याचा निर्णय कायम





### आतील पानांत
- दिल्लीचा चेपॉकवर ऐतिहासिक विजय!
- सर तुम्ही कशाला चिंता करता
- जेव्हा नक्षलवादी मारला जातो!
- संसदेत मंजुरी, न्यायालयात आव्हान

### दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाला संघाचा आशीर्वाद

# फडणवीस होतील पायउतार!

## संजय राऊतांचं मोठं विधान, पुण्यातील घटनेवरुन केली टीका

। मुंबई । प्रतिनिधी । महाईन्यूज

**गर्भवती महिलेच्या मृत्यूला कारणीभूत ठरलेल्या पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाला संघाचा आशीर्वाद असल्याने रुग्णालयावर कोणतीही कारवाई होणार नाही, असा आरोप शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला.**



दहा लाख रुपयांसाठी गर्भवती महिलेच्या मृत्यूला कारणीभूत ठरलेल्या पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाला संघाचा आशीर्वाद असल्याने रुग्णालयावर कोणतीही कारवाई होणार नाही, असा आरोप शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला.

रुग्णालय विरोधामध्ये होणाऱ्या आंदोलनाला ‘शो’ म्हटले जाते असा भंपक कारभार राज्यांमध्ये सुरू आहे. त्यामुळे शरद पवार, शंकरराव चव्हाण, सुधाकर नाईक, मनोहर जोशी यांच्यासारख्या मुख्यमंत्र्यांच्या कारकिर्दीपर्यंत आताचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पोहोचू शकत नाही असे सांगत त्याआधीच फडणवीस पायउतार होतील, अशी टीका राऊत यांनी केली.

पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत नाशिकमध्ये होणाऱ्या शिबिराचा आढावा घेण्यासाठी राऊत शनिवारी दौऱ्यावर होते. यावेळी राऊत यांनी भाजप, शिंदे यांची शिवसेना व मनसेवर टीका केली. वक्फ विधेयकांवरून खासदार असदुद्दीन ओवैसींवर टीका करणाऱ्या शिंदे यांचे खासदार आणि ओवैसी एकाच ठिकाणी बसून चहा पित असल्याचे एका छायाचित्रात दिसत आहे. यात दुसरे कुणी असते तर, हिंदू धोक्यात आला असता, अशी टीका शिंदेसेनेने केली असती, असे ते राऊत म्हणाले.

### मनसेचे आंदोलन फडणवीस पुरस्कृत

मराठी भाषेवरून मनसेचे आंदोलन हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पुरस्कृत असल्याची टीका खासदार राऊत यांनी केली. मराठीचा मुद्दा सर्वप्रथम शिवसेनेने घेतला असून, आम्ही केवळ कानफाटामध्ये मारून व मारामारी करून थांबलो नाही, तर स्पर्धा परीक्षेच्या युगामध्ये मुलांना तयार करण्याचे प्रयत्न केले. किरकोळ शिपायाच्या कानफाटात मारून काही होत नाही. ज्यांच्या हातात निर्णय घेण्याची क्षमता, जो प्रमुख त्याच्या कानफाटात मारले पाहिजे. शिपाई, चहा देणाऱ्याला मारहाण करून काय उपयोग? असा सवाल राऊत यांनी केला.

### पुण्यात एचएसआरपी नंबरप्लेटचा काळाबाजार

## कमी खर्चाचं आमिष,, एजन्सी असल्याचं भासवून फसवणूक

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कमी खर्चाचे आमिष दाखवून बारामती, अकलूज, इंदापूर आणि दौंड शहरात बनावट उच्च सुरक्षा (एचएसआरपी) नंबर प्लेटचा काळाबाजार सुरू आहे. या प्रकारच्या नंबरप्लेट बसवण्याची अंमलबाजवणी परिवहन विभागाने फिटमेंट एजन्सीच्या माध्यमातून सुरू केली. मात्र एजन्सीच्या माध्यमातूनच काम सुरू असल्याचे भासवून सर्वसामान्यांची फसवणूक केली जात आहे.**




उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या अंतर्गत मार्च २०२५ अखेर सहा लाख १२ हजार ४७५ वाहनांची नोंद झाली असून त्यामध्ये एक एप्रिल २०१९ अगोदरच्या १४ हजार ३९७, तर एक एप्रिल २०१९ नंतर एक लाख ६७ हजार १६६ वाहनधारकांनी वाहनांना प्रत्यक्ष ‘हाय सिक्युरिटी नंबरप्लेट’ बसविल्या गेल्या आहेत.

किचकट ऑनलाइन प्रोसेस आणि त्यानंतर प्लेटसाठी सुमारे महिनाभर वाट पाहावी लागत अल्यामुळे वाहनधारकांना ‘एचएसआरपी’ नंबरप्लेट बसवण्यासाठीच्या फंदात न पडता अनेक ठिकाणी बनावट नंबरप्लेट बसवून घेतल्या जात आहेत.

‘हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट’ ही ॲल्युमिनियमपासून बनविलेली असते. या नंबरप्लेटच्या डाव्या कोपऱ्यात एक ‘युनिक लेसर ब्रँडेड’चा दहाअंकी पिन असतो. नंबरप्लेटवर एक होलोग्राम जोडण्यात आला असून तो क्रोमियम आधारित आहे. स्टिकरप्रमाणे दिसणाऱ्या होलोग्राममध्ये वाहनाचा सर्व तपशील नोंद होतो. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, या नंबरप्लेटला स्नॅपलॉक असल्यामुळे बनावट पद्धतीने ती बनवता येत नाही. रस्ते आणि वाहनांसंबंधित गुन्हे रोखण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला. वस्तूंची ऑनलाइन विक्री करणाऱ्या साइटवरून १५० ते ५०० रुपयांपर्यंत एचएसआरपी प्लेटच्या नावाखाली बनावट नंबरप्लेट घरपोच मिळते. मात्र, अधिकृत नेमणूक केलेल्या एजन्सीकडून ग्राहकांना दुचाकीसाठी ५३० रुपये अधिकृत पावती आणि १२० रुपये फी असे शुल्क आकारले जाते.

### हाय सिक्युरिटी नंबरप्लेटची प्रक्रिया

नंबरप्लेटची ऑनलाइन नोंदणी करताना वाहनाचा क्रमांक, वाहनाच्या चासीचा क्रमांक, पत्ता, मोबाइल क्रमांक अशी माहिती भरावी लागते. अर्ज सबमिट केल्यानंतर पैसे भरता येतात. त्यानंतर त्याची पावती डाउनलोड करता येते. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर काही दिवसांत हाय सिक्युरिटी नंबरप्लेट मिळते. नागरिकांनी या प्रक्रियेचाच अवलंब करावा, असे आवाहन परिवहन विभागाने केले आहे.

# चूक असल्यास चूक म्हणावेच लागेल!

## धर्मादाय' एका व्यासपीठावर, मुख्यमंत्र्यांची माहिती

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**'दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात घडलेली घटना भविष्यात घडू नये, यासाठी नियमावली करण्याची गरज आहे. गरीब आणि गरजू रुग्णांना चांगले उपचार मिळावेत, यासाठी संपूर्ण धर्मदाय व्यवस्था एका व्यासपीठावर (प्लॅटफॉर्मवर) आणून मुख्यमंत्री कार्यालयातील रुग्ण सहायता कक्षदेखील याला जोडण्याचा प्रयत्न आहे,' असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी सांगितले. 'रुग्णालयातील दोषींवर कारवाई होणारच,' असेही त्यांनी स्पष्ट केले.**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस शनिवारी पुणे दौऱ्यावर होते. मृत्युमुखी पडलेल्या गर्भवतीच्या कुटुंबीयांनी फडणवीस यांची भेट घेतली. त्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, 'धर्मदाय व्यवस्था एका क्लिकवर आणण्याचा प्रयत्न आहे. यामुळे कोणत्या रुग्णालयामध्ये किती बेड आहेत, त्यांपैकी किती बेड उपलब्ध आहेत, ते योग्य पद्धतीने दिले जात आहेत की नाही, यावर संपूर्ण लक्ष ठेवता येईल. मुख्यमंत्री कार्यालयातील रुग्ण मदत कक्षदेखील याला जोडण्याचा प्रयत्न आहे. यामुळे संबंधित रुग्णालयांवर आवश्यक तो दबाव कायम राहील. गरजू रुग्णांना चांगले उपचार मिळतील.''दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात घडलेला प्रकार पुन्हा घडू नये, यासाठी आवश्यक ती खबरदारी घेतली जाणार आहे. नुकत्याच झालेल्या अधिवेशनामध्ये धर्मादाय आयुक्तांना देण्यात येणाऱ्या अधिकारांमध्येदेखील सुधारणा करण्यात आली आहे. विधी आणि न्याय विभागाच्या वतीने यासाठी कायद्यात बदलदेखील करण्यात आला असून, याचे सकारात्मक परिणाम पुढील काही महिन्यांत दिसून येतील,' असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.'लतादीदी आणि मंगेशकर कुटुंबीयांनी दीनानाथ मंगेशकर रुग्णालय खूप मेहनतीने उभारले. हे नावाजलेले रुग्णालय आहे. येथे रुग्णांवर अनेक प्रकारच्या शस्त्रक्रिया आणि उपचार होतात. त्यामुळे रुग्णालयाचे सर्व काही चूक आहे, असे म्हणण्याचे काही कारण नाही. मात्र, कालचा जो प्रकार झाला तो असंवेदनशीलच होता. जे चूक आहे ते चूक म्हणावेच लागेल. आपली चूक ते सुधारत असतील, तर त्याचा आनंद आहे,'

### 'शोबाजी बंद करा'

विधी आणि न्याय विभागाच्या वतीने यासाठी कायद्यात बदलदेखील करण्यात आला असून, याचे सकारात्मक परिणाम पुढील काही महिन्यांत दिसून येतील,' असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.'लतादीदी आणि मंगेशकर कुटुंबीयांनी दीनानाथ मंगेशकर रुग्णालय खूप मेहनतीने उभारले. हे नावाजलेले रुग्णालय आहे. येथे रुग्णांवर अनेक प्रकारच्या शस्त्रक्रिया आणि उपचार होतात.

असे मुख्यमंत्री म्हणाले.राजकीय पक्ष आणि संघटना अजूनही दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या विरोधात आंदोलने करत आहेत. त्याबाबत फडणवीस म्हणाले, 'आता विनाकारण 'शोबाजी' करू नये. भाजपची महिला आघाडी वा कोणत्याही पक्षाच्या महिलांनी या घटनेचा निषेध करण्यासाठी केलेली तोडफोड अयोग्य आहे.' मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस शनिवारी पुणे दौऱ्यावर होते. मृत्युमुखी पडलेल्या गर्भवतीच्या कुटुंबीयांनी फडणवीस यांची भेट घेतली. त्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, 'धर्मदाय व्यवस्था एका क्लिकवर आणण्याचा प्रयत्न आहे. यामुळे कोणत्या रुग्णालयामध्ये किती बेड आहेत, त्यांपैकी किती बेड उपलब्ध आहेत, ते योग्य पद्धतीने दिले जात आहेत की नाही, यावर संपूर्ण लक्ष ठेवता येईल. मुख्यमंत्री कार्यालयातील रुग्ण मदत कक्षदेखील याला जोडण्याचा प्रयत्न आहे. यामुळे संबंधित रुग्णालयांवर आवश्यक तो दबाव कायम राहील. गरजू रुग्णांना चांगले उपचार मिळतील.''दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात घडलेला प्रकार पुन्हा घडू नये, यासाठी आवश्यक ती खबरदारी घेतली जाणार आहे. नुकत्याच झालेल्या अधिवेशनामध्ये धर्मादाय आयुक्तांना देण्यात येणाऱ्या अधिकारांमध्येदेखील सुधारणा करण्यात आली आहे.

# भ्रष्ट राजकारण्यांवर जलद गतीने खटले चालवा

## माजी आयपीएस अधिकारी किरण बेदी यांचे मत

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**देशाच्या व्यवस्थेत मूलभूत सुधारणा करायच्या असतील तर, भ्रष्ट राजकारण्यांवर जलद गतीने खटला चालवणे गरजेचे आहे. नेते प्रामाणिक असतील तर व्यवस्था आणि जनताही प्रामाणिक राहते. त्यामुळे भ्रष्ट नेत्यांवर तत्काळ कारवाई करून त्यांना थेट तुरुंगात धाडायला हवे. अशा नेत्यांना पुन्हा निवडणूक लढवता येऊ नये म्हणून कायदा करण्यात यावा,' असे मत माजी आयपीएस अधिकारी किरण बेदी यांनी शनिवारी व्यक्त केले.**



'फिक्की'च्या पुणे विभागाच्या वतीने 'करेज, कन्वेंक्शन अँड चेंज' या विषयावरील चर्चासत्रात बेदी बोलत होत्या. सिंबायोसिसचे संस्थापक शां. ब. मुजुमदार, खडकी कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनाक्षी लोहिया, 'फिक्की'च्या अध्यक्षा अनिता अग्रवाल, सिम्बायोसिस इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीच्या प्राचार्या डॉ. विद्या येरवडेकर आदी उपस्थित होते. किरण बेदी म्हणाल्या, 'महिलांनी घराबाहेर पडायला हवे. बाहेरच्या जगातील संघर्ष सोसला पाहिजे. त्यांनी मैदानी खेळ, गिर्यारोहनासारख्या उपक्रमांमध्ये सहभाग घ्यायला हवा. घराच्या चार भिंतींमध्ये राहून महिलांना त्यांची प्रगती साधता येणार नाही. त्यांना

### निवडणूक लढवता येऊ नये

समाजात वावरताना अनेक प्रश्न विचारले जातात. निर्णयांची, घटनांची आणि कामाचीही सत्यता तपासली जाते. अशा वेळी जपून ठेवलेले दस्तऐवज कामी येतात. वृत्तपत्राचे छोटे कात्रणही तुमच्या कामाची खात्री पटण्यास पुरेसे ठरते, असे मत किरण बेदी यांनी व्यक्त केले.'फिक्की'च्या पुणे विभागाच्या वतीने 'करेज, कन्वेंक्शन अँड चेंज' या विषयावरील चर्चासत्रात बेदी बोलत होत्या.

बाहेर पडून संघर्ष करावाच लागेल. त्यासाठी कुटुंबातूनही प्रोत्साहन, पाठबळ मिळायला हवे. तेव्हाच मुलींना खऱ्या अर्थाने यशस्वी होता येईल.'नेतृत्वगुण घडवावे लागत नाहीत. त्यांची ओळख व्हायला हवी. महिलांमध्ये नेतृत्वासाठीचे अनेक आवश्यक गुण अंगभूत प्राप्त असतात. त्यांना गरज आहे ती, स्वत:वर विश्वास ठेवून चिकाटीने काम करण्याची. जिद्दीने पुढे जाण्याची.' असेही किरण बेदी म्हणाल्या.पंतप्रधानांच्या गाडीला क्रेनने उचलणे, तिहार जेलमध्ये केलेल्या 'विपश्यने'च्या उपक्रमांची माहिती देतानाच बेदी यांनी अधिकारी म्हणून काम करताना आलेले अनुभव सांगितले.आयुष्यात अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते. चांगले-वाईट प्रसंग समोर येत असतात. त्यांच्या आठवणी जपून ठेवायला हव्यात.

## भाजपा नेते आमदार महेश लांडगे यांची शिष्टाई

# चऱ्होलीतील 'त्या' रस्त्यासाठी "ग्रीन सिग्नल" !

### नागरिकांच्या सोयीसाठी घेतला पुढाकार

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**वन विभागाच्या हद्दीतील रस्त्याला सीमाभिंत घालण्याचे काम सुरू केल्यामुळे चऱ्होली येथील खंडोबा माळ परिसरातील नागरिकांची चिंता वाढली होती. मात्र, आमदार महेश लांडगे यांनी वन विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेतली आणि नागरिकांच्या हिताच्या दृष्टीने निर्णय घ्यावा, अशी मागणी केली. अखेर सीमाभिंती तयार करता रस्ता ठेवण्याबाबत वन विभागाने सकारात्मक भूमिका घेतली आहे.**



चऱ्होली बु, खंडोबा माळ, सर्वे नंबर 98/4, सनसिटी व सेव्हनहिल या लोहगाव हद्दीतील वनविभागाच्या जागेतून जाणाऱ्या रस्त्याच्या ठिकाणी वन विभागाकडून सीमा भिंतीचे काम चालू करण्यात आले होते. त्यामुळे खंडोबा माळ परिसरातील रहिवाशांना लोहगावकडे जाण्यासाठी जवळचा रस्ता बंद होणार होता. ही बाब स्थानिक नागरिकांनी भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांच्या निदर्शनास आणून दिली.

दरम्यान, आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने वन विभाग, महापालिका आणि नगर रचना विभागाच्या अधिकाऱ्यांची पुण्यात बैठक घेण्यात आली. यामध्ये डूडूळगाव येथील लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नगरला अत्यावश्यक मूलभूत सुविधा पुरविणे हे दोन्ही प्रश्न निकाली काढण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली. यावेळी पिंपरी-चिंचवडचे माजी महापौर नितीन काळजे यांच्या समवेत,अप्पर प्रधान मुख्यवनरक्षक, (केंद्रीय अधिकारी) नरेश झुरमुरे, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रीय अधिकारी राजेश आगळे, नगररचना विभागाचे संचालक प्रसाद गायकवाड,संदेश खडतरे, स्थापत्य विभागातील कार्यकारी अभियंता श्री.वाडकर आदी उपस्थित होते.

> "वन विभागाच्या हद्दीत मात्र ग्रामपंचायत काळापासून वसलेल्या डुडुळगाव येथील लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नगरमध्ये महापालिका प्रशासनाला पायाभूत सोयी-सुविधा देता येत नाही. याबाबत नुकतेच राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांची भेट घेतली होती. त्यानंतर वन विभागाने सीमाभिंतीचे काम सुरू केल्यामुळे चऱ्होली बु. खंडोबा माळ येथील रस्ता बंद होत होता. याबाबत संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेतली आणि स्थानिक नागरिकांच्या हिताच्या दृष्टीने काम करावे, अशी सूचना केली आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांना दिलासा मिळाला आहे. तसेच, वन विभागाच्या हद्दीत होणारे 'इको टुरिझम पार्क' प्रकल्पासाठीही आम्ही पाठपुरावा करीत आहोत.
>
> –महेश लांडगे,
> आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

## रुग्णालयातील दोषींवर कठोर कारवाई केली जाईल

### दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे भिसे कुटुंबीयांना आश्वासन

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहरातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालय प्रशासनाने पैशांच्या हव्यासापोटी उपचारात अडवणूक केल्याने तनिषा भिसे या गर्भवती महिलेला जीव गमावावा लागला. या घटनेनंतर संपूर्ण राज्यातून दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाविरोधात संताप व्यक्त केला जातोय. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाची दखल घेत समितीही नेमली आहे. आज देवेंद्र फडणवीस यांनी भिसे यांच्या कुटुंबीयांची बालेवाडी येथे भेट घेतली. यावेळी आमदार अमित गोरखे, गृहराज्यमंत्री योगेश कदम उपस्थित होते.**




याप्रसंगी दीनानाथ मंगेशकर रुग्णालयातील दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले आहे. त्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. कालचा प्रकार हा असंवेदनशील होता. जिथे चूक आहे, तिथे चूक म्हणावं लागेल, असे म्हणत फडणवीस यांनी दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाबाबत प्रतिक्रिया दिली आहे. फडणवीस म्हणाले, रुग्णालयाला त्यांची चूक सुधारावी लागेल. ते ही चूक सुधारण्यासाठी प्रयत्न करणार असतील तर आम्हाला आनंद आहे. मी नेमलेल्या समितीचा जोपर्यंत अहवाल येत नाही. तोपर्यंत आता तरी बोलणे योग्य ठरणार नसल्याचे त्यांनी यावेळी सांगितले आहे. हॉस्पिटलबाहेर सातत्याने विविध पक्ष, संघटना आंदोलन करत आहेत. त्याबाबत बोलताना फडणवीस म्हणाले, रुग्णालयाबाहेर आंदोलन करणे योग्य नाही. शो बाजी बंद झाली पाहिजे. घैसास यांच्या रुग्णालयाची झालेली तोडफोड समर्थनीय नाही.

#### कठोर कारवाई केली जाईल..

दीनानाथ मंगेशकर हे रुग्णालय लतादीदी आणि मंगेशकर परिवाराने खूप मेहनतीने उभारले आहे. हे रुग्णालय अत्यंत नावाजलेले आहे. या रुग्णालयात अनेक शस्त्रक्रिया आणि उपचार होतात. अशा घटना रुग्णालयात घडणे चुकीचे आहे. याबाबत दीनानाथ मंगेशकर रुग्णालयातील दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले आहे.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### संत कसे असतात ?

आपले शहाणपण बाजूला ठेवून जो संताला शरण जातो तोच खरा साधक. ज्याला सर्व सृष्टी रामरूप दिसते, आणि शिष्यालाही जो रामरूप पाहतो, तोच खरा गुरू. सद्‌गुरू कधीही मिंधेपणाने वागत नाही, आणि त्याला भीतीचा लवलेशही नसतो. आपला शिष्य कोणत्या आध्यात्मिक भूमिकेवर आहे हे संतांना कळते. देहबुद्धीचे लोक विषयाचे दास असतात, पण संत मात्र विषयावर मालकी गाजवतात. संतांजवळ जे समाधान असते ते आपल्याला लाभले, किंवा त्याची आवड उत्पन्न झाली म्हणजे संतांची प्रचीती आली असे समजावे. औषध काय आहे हे न कळतासुद्धा रोग्याने ते श्रद्धेने घेतले तर त्याला गुण येतो, किंवा एखाद्याला स्वयंपाक करता आला नाही तरी त्याला अन्नाची चव समजते आणि तो पोटभर जेवू शकतो. त्याचप्रमाणे एखाद्याला ज्ञानाचा अनुभव येईल, पण शब्दाने त्याला तो सांगता येईलच असे नाही.

मीठ खारट आहे याचे जसे आपल्याला दुःख होत नाही, त्याचप्रमाणे जगामधल्या लढाया, हाणामाऱ्या, सज्जनांचा छळ, संकटे, यांचे संतांना वाईट वाटत नाही. 'वाईट वाटत नाही' याचा अर्थ ते त्यांना आवडते असा मात्र मुळीच नव्हे. पण मीठ जसे खारटच असणार, तशा जगात या घडामोडी होणारच, जगाची रहाटीच अशी आहे, हे समजून तो दुःख करणार नाही. किंबहुना, मीठ फार झाले तर खारटपणा जसा सहन होत नाही, तसे त्यालाही होईल. इतकेच नव्हे, तर त्याचा प्रयत्नही जगातले वाईट कमी करण्याकडेच असतो.

विहिरीतल्या बेडकांना जशी समुद्राची कल्पना येत नाही तशी आपल्याला संतांची कल्पना येत नाही. संत हे पहिल्याने आपल्यासारखेच होते, परंतु अनुसंधानाच्या मार्गाने ते वर गेले. आपल्याला संत 'शोधण्याची' मुळीच जरुरी नाही. आपली इच्छा बलवत्तर असेल तर संतच आपला शोध करीत आपल्याकडे चालत येतील. आपली भावना कशी आहे इकडे संतांचे लक्ष असते. संत हा गुप्तपोलिसासारखा आहे; तो आपल्यामध्ये आपल्यासारखा राहतो, पण आपल्याला ओळखता येत नाही. संताला स्वतःच्या शरीरात काय चालले आहे ते सर्व दिसते; म्हणून तो रोगाची काळजी करीत नाही. संताला कर्म मागेपुढे करता येते, पण ते टाळता येत नाही; ते कुणाला तरी भोगलेच पाहिजे. संत जे साधन सांगतात ते आपल्या शक्तीप्रमाणेच असते. संत जो बोध सांगतात, त्याचे आपण थोडेतरी पालन करू या.

बोधवचन:- संत हा जसे बोलतो तसे वागतो. आपण बोलतो चांगले आणि वागतो मात्र त्याच्या उलट.



'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील

संस्थापक, संपादक

**दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल.. गर्भवती महिलेचा मृत्यू आणि त्यानंतर घडत चाललेले रामायण म्हणा किंवा महाभारत ! यानिमित्ताने आज मला माझ्या एका मित्राचा किस्सा आठवतो. त्याच्या एका बऱ्या झालेल्या व्याधीबद्दल मला त्याने पूर्वी सांगितले होते. त्याला भस्म्या रोग झाला होता. कितीही अन्न खाल्ले, तरी तो दर दोन तासांनी भुकेने व्याकूळ व्हायचा. पोटात भुकेने खड्डा पडून त्याची तगमग व्हायची. बायको बिचारी दिवसभर स्वयंपाक घरातच असायची. तिचे कष्ट बघून त्याला रडायला यायचं, पण भूक अनावर झाली, की तिने तयार केलेल्या अन्नाचा तो फडशा पाडायचा..!**

### सारं कुटुंबच रडकुंडीला..

सगळं कुटुंब त्याच्या या व्याधीनं रडकुंडीला आलं होतं. ईश्वरी कृपेनं तो योग्य उपचार मिळाल्यानं त्यातून पूर्ण बरा झाला. भस्म्या रोग ही इतकी भयंकर व्याधी असल्याचं मला प्रथमच कळलं. त्याची व्याधी शारीरिक होती.

### पण भस्म्याची मानसिक व्याधी झाली तर ?

शारीरिक पातळीवर भस्म्या झाला, तर रुग्ण सारखे अन्न खातो. मानसिक पातळीवर भस्म्या झाला, तर रुग्णाला पैशाची अनिवार भूक लागते. त्याला खूप पैसा मिळाला, तरी त्याचे यत्किंचितही समाधान न होता, तो अधिकाधिक पैसा मिळवण्यासाठी वेगवेगळे मार्ग शोधून काढतो. माझ्या परिचयाच्या एका राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्याने मला त्याचा एक अनुभव सांगितला होता.

### नोटांच्या बंडलांना गंजलेला वास..

निवडणुकांच्या हंगामात त्याला एका पुढाऱ्यानं लोकांना वाटायला नोटांची बंडलं दिली होती. त्या नोटांना बरेच दिवस बंदिस्त ठेवल्यानं येतो, तसा वास येत होता. त्यांना ज्या पिना मारल्या होत्या, त्यांचे गंजल्यामुळे तुकडे पडत होते, इतकी ती बंडलं जुनी होती. निवडणुकांच्या निमित्तानं बरीच वर्षे अंधाऱ्या तिजोरीत बंदिवासात असलेल्या त्या नोटांना काही वर्षांनी मोकळ्या हवेत श्वास घेता आला होता.

### आज सुरेश भट आठवले..

लोक फक्त नोटाच तिजोऱ्यात ठेवत नाहीत. ते समाजाचं स्वास्थ्य, सुख, मनःशांती, आनंद, विश्वास, जगण्याच्या किमान गरजा, हे सारं आपल्या तिजोऱ्यात बंद करून ठेवतात, हे त्यामुळं लक्षात आलं. सुरेश भटांनी आणीबाणीच्या काळात लोकशाहीचा गळा आवळला गेला, तेव्हा लिहिलं होतं.. तिजोऱ्यात केले त्यांनी बंद स्वर्ग साती ! आम्हावरी संसाराची उडे धूळ माती..! तेव्हा राजकीय सत्तेने समाजाचा गळा आवळला होता, आता अर्थसत्तेने समाजाचा गळा पुरता आवळला आहे.

# पैसारूपी दुर्धर भस्म्यारोगानंच साऱ्या समाजाला पछाडलंय..!






### अपार संपत्तीची वखवख..

मनुष्य शारीरिक व्याधी झाल्याचे मान्य करतो, ती काही तपासण्या करून सिद्ध करता येते. पण, अपार संपत्तीची निरंतर वखवख हे लक्षण असलेल्या मानसिक भस्म्याची लागण झालेली कोणीही मान्य करीत नाही. ती कोणत्याही तपासण्यांनी सिद्ध करता येत नाही. काही लोक स्वखुशीने ही लागण करवून घेतात. काही लोक प्रवाहपतित असल्याने या व्याधीला बळी पडतात. संपूर्ण समाजच या व्याधीची अधिकाधिक लागण व्हावी, यासाठी खूप वेगाने आता प्रयत्न करताना दिसतोय. हे अत्यंत चिंताजनक आहे. याचे परिणाम समाज रोज भोगतोय.

### नुसता पैसा नको, तो भरपूर हवाय..

प्रत्येकाला पैसा हवाय, गरजेपुरता नको, खूप हवाय.. ओसंडून वाहणाऱ्या परमिट रूम्स, बियर बारमधून तो पैसा पाण्यासारखा वाहायला हवाय. डान्सबार आणि पब्जमधून नोटा उडवायला पैसा हवाय. दरवर्षी परदेशी पर्यटनावर खर्च करायला पैसा हवाय. परदेशी कॅसिनोमध्ये एकेका रात्री लक्षावधी रुपये हरण्याचे 'थ्रील' अनुभवण्यासाठी पैसा हवाय. समाज सेवा करण्यासाठी कोणाला चाळीस पन्नास लाखांची भारदस्त दिसणारी एसयुव्ही विकत घेण्यासाठी, त्यातून हजारो किलोमीटर भटकंती करण्यासाठी पैसा हवाय..!

### वाटा भरपूर आहेत..पैसा फक्त हवाय!

कोणाला साध्या हॉस्पिटलऐवजी मल्टिस्पेशॅलिटी मेडिकल रिसर्च सेंटर उभारण्यासाठी पैसा हवाय..कोणाला निवडणुकांसाठी पैसा हवाय..कोणाला आलिशान बंगला, भलेमोठे पॉश फ्लॅट घेण्यासाठी पैसा हवाय..कोणाला शिक्षणाच्या माध्यमातून समाजसेवा करण्यासाठी, कॉर्पोरेट चेहरा असलेली शिक्षण संस्था उभारण्यासाठी पैसा हवाय. कोणाला गुळगुळीत रस्ते बांधून त्यावर पंचवीस वर्षे वाढत्या दराने टोलवसुली करूनही पोट भरत नाही, यासाठी आणखी पैसा हवाय. मूठभर रुग्णांवर लक्षावधी रुपये खर्च होतील, असे महागडे उपचार करता यावेत, यासाठी हेल्थ इन्शुरन्सच्या नावाखाली लक्षावधी लोकांना भीती दाखवून त्यांच्या खिशातून पैसा काढण्यासाठी नेटवर्क उभं करायला पैसा हवाय !

### जुजबी उपचारासाठी थोडा पैसा हवाय..

रोज कण कण झिजत असह्य वेदनांनी कण्हत असलेल्या जीवलगावर जुजबी उपचार करायला त्यांना थोडा पैसा हवाय. बापाने डोक्यावर असलेल्या कर्जाच्या ओझ्यामुळे आत्महत्या करू नये, यासाठी कुटुंबावर असलेलं कर्ज फेडायला हातावरचं पोट असणाऱ्यांना थोडा पैसा हवाय. पायातल्या चपलेच्या तुटलेल्या अंगठ्याला मारलेला खिळा लागून पायाला झालेल्या जखमेच्या ड्रेसिंगसाठी थोडा पैसा हवाय, थोडा जास्त मिळालातर चप्पलही विकत घेता येईल. सणासुदीला, दिवाळीत गोडधोड जेवण करायला, निरागस मुलाबाळांना वर्षातून किमान एकदा तरी नवीन कपडे घेता यावे, त्यांना चार फटाके, फुलबाज्या फिरवत 'दिन दिन दिवाळी' म्हणत आनंद साजरा करायला थोडासा पैसा हवाय.

### काहींना थोडासाच पैसा हवाय..

सगळ्या कुटुंबाला छ. संभाजी राजांचे बलिदान समजावे, यासाठी त्यांच्या जीवनावर तयार केलेला चित्रपट दाखवायला थोडा पैसा हवाय. जगणं असह्य केलेल्या टग्यांपासून बचाव करायला न्यायालयाची पायरी चढताना वकिलाला द्यायला त्यांना थोडासा पैसा हवाय. वयात आलेल्या मुलीच्या लग्नात तिच्या गळ्यात काळ्या पोतीच्या मंगळसूत्रात दोन सोन्याचे मणी आणि दोन सोन्याच्या वाट्या गुंफायला थोडासा पैसा हवाय.

### आवश्यक गोष्टींसाठी पैसा हवाय..

हातपाय थकल्यावर मरण येईपर्यंत जगण्यासाठी लागणारी बचत करता यावी, यासाठी थोडासा पैसा हवाय. ज्यांना थोडासा पैसा हवाय, त्यांच्यात आणि ज्यांना मानसिक भस्म्याची लागण झाली आहे, त्यांच्यात असलेलं अंतर रोज वाढतच चाललंय. यावर बुद्धीमान अर्थशास्त्रज्ञ बोलत नाहीत.. राजकारणी बोलत नाहीत. सामाजिक कार्य करणारे विचारवंत बोलत नाहीत. शिक्षक, प्राध्यापक बोलत नाहीत.. शहाणे बोलत नाहीत..अडाणी लोकही बोलत नाहीत.. जे अति खातात, ते ते सगळं पचवण्यासाठी अनेकांची मदत विकत घेतात..! ज्यांची पोटं खपाटीला गेली आहेत, त्यांनी भूक मारण्यासाठी ओंजळीत अजून तरी फुकट मिळणारं पाणी घेऊन ते पोटात ढकलावं आणि हातपाय पोटाशी घेऊन शरीर आक्रसून रात्र कधीतरी सरेल, कधीतरी उजाडेल, या आशेवर निद्रा प्रसन्न होण्यासाठी प्रार्थना करावी. ज्या दुर्दैवी 'ईश्वरी भिसे' या आईला तिच्या नवजात अर्भकांचा दुःखद वियोग घडला, तिच्या आणि कुटुंबियांच्या दारुण दुःखाला हा लेख समर्पित आहे. ईश्वरा, माझ्या समाजाला मानसिक भस्म्यापासून बरं कर, रे बाबा!

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.

**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मला तुरुंगात टाकण्याचे नियोजन!

## उपमुख्यमंत्री शिंदे यांचे महाविकास आघाडीवर गंभीर आरोप

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कोल्हापूरातील एका कार्यक्रमात पुन्हा एकदा महाविकास आघाडीला लक्ष्य करत गंभीर आरोप केले आहेत. लोकसभा निवडणुकीत फेक नॅरेटीव्ह पसरवून विजय मिळवणाऱ्या महाविकास आघाडीने विधानसभा निवडणुकीतही विजय मिळवू या विश्वासाने महायुतीच्या नेत्यांना तुरुंगात टाकण्याचे नियोजन केल्याचा आरोप शिंदे यांनी केला आहे.**



### फडणवीसांनांही जेलमध्ये टाकू

मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळाचे वाटप केले आणि म्हणाले, एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस यांना जेलमध्ये टाकू. त्यांना बर्फाच्या लादीवर झोपवून मारू. एवढी हवा त्यांच्या डोक्यात गेली होती," असा दावा उपमुख्यमंत्र्यांनी केला.पुढे बोलताना एकनाथ शिंदे यांनी लाडकी बहीणसारख्या योजनांमध्ये विरोधकांनी खोडा घातल्याचा आरोपही केला. या योजनेमध्ये खोडा घातला होता, त्यांना तुम्ही चांगला कोल्हापूरी जोडा दाखवला. महायुतीचे सरकार आले. आजही आमची टीम तिच आहे. देवेंद्रजी, मी आणि अजित दादा."दरम्यान गेल्या वर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीने महायुतीचा धुव्वा उडवत राज्यातील ४८ पैकी २९ जागा जिंकल्या होत्या.

कोल्हापूरातील सरवडे येथे आरोग्य मंत्री प्रकाश अबिटकर यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नागरी सत्कार सोहळ्याचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले की,"बाळासाहेब सांगायचे कार्यकर्ता घरात नाही तर लोकांच्या दारात शोभून दिसतो. एकनाथ शिंदेने या अडीच वर्षांच्या काळात हेच काम केले. मी लोकांमध्ये रमणारा आहे. गेल्या अडीच वर्षात केलेल्या कामची पावती जनतेने दिली.""या विधानसभा निवडणुकीत जनतेने ऐतिहासिक विजय मिळवून दिला. लोकसभेमध्ये फेक नॅरेटीव्ह पसरवले. संविधान धोक्यात आहे, आरक्षण जाणार अशा खोट्या गोष्टी पसरवल्यामुळे आमचे संजय मंडलिक त्यात अडकले. त्यांना वाटले विधानसभा निवडणुकीतही असेच करू. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळाचे वाटप केले आणि म्हणाले, एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस यांना जेलमध्ये टाकू. त्यांना बर्फाच्या लादीवर झोपवून मारू. एवढी हवा त्यांच्या डोक्यात गेली होती," असा दावा उपमुख्यमंत्र्यांनी केला.पुढे बोलताना एकनाथ शिंदे यांनी लाडकी बहीणसारख्या योजनांमध्ये विरोधकांनी खोडा घातल्याचा आरोपही केला. ते म्हणाले, "विधानसभा निवडणुकीवेळी ज्यांनी या योजनेमध्ये खोडा घातला होता, त्यांना तुम्ही चांगला कोल्हापूरी जोडा दाखवला. महायुतीचे सरकार आले. आजही आमची टीम तिच आहे. देवेंद्रजी, मी आणि अजित दादा."दरम्यान गेल्या वर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीने महायुतीचा धुव्वा उडवत राज्यातील ४८ पैकी २९ जागा जिंकल्या होत्या. यामध्ये सर्वाधिक १३ जागा काँग्रेस, ९ जागा शिवसेना आणि ७ जागा राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) यांनी जिंकल्या होत्या. तर महायुतीच्या वाट्याला अवघ्या १८ जागा आल्या होत्या. यामध्ये सांगलीतून विशाल पाटील अपक्ष म्हणून विजयी झाले होते. मात्र, त्यानंतर ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीने दमदार पुनरागम करत सत्ता कायम राखली होती. यामध्ये सर्वाधिक जागा जिंकणाऱ्या भाजपाचे देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री तर अजित पवार आणि एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री झाले.कोल्हापूरातील सरवडे येथे आरोग्य मंत्री प्रकाश अबिटकर यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नागरी सत्कार सोहळ्याचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले की,"बाळासाहेब सांगायचे कार्यकर्ता घरात नाही तर लोकांच्या दारात शोभून दिसतो. एकनाथ शिंदेने या अडीच वर्षांच्या काळात हेच काम केले. मी लोकांमध्ये रमणारा आहे. गेल्या अडीच वर्षात केलेल्या कामची पावती जनतेने दिली.""या विधानसभा निवडणुकीत जनतेने ऐतिहासिक विजय मिळवून दिला. लोकसभेमध्ये फेक नॅरेटीव्ह पसरवले. संविधान धोक्यात आहे, आरक्षण जाणार अशा खोट्या गोष्टी पसरवल्यामुळे आमचे संजय मंडलिक त्यात अडकले.

# सरकार रुग्णालय ताब्यात घेणार का?

## दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटलबाबत आदित्य ठाकरेंचं मोठं भाष्य

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयातील गर्भवती महिला मृत्यू प्रकरणी राज्यभरातून संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. एका गर्भवती महिलेवर उपचार करण्यासाठी १० लाखांची अनामत रक्कम मागितल्याचा आरोप दीनानाथ मंगेशकर रुग्णालय प्रशासनावर करण्यात आला आहे. दरम्यान, या घटनेतील गर्भवती महिलेचा मृत्यू झाला आहे. या प्रकरणावरून दीनानाथ मंगेशकर रुग्णालयावर टीकेची झोड उठली आहे.**



### आदित्य ठाकरे काय म्हणाले?

पुण्यातील गर्भवती महिलेच्या मृत्यू प्रकरणानंतर भाजपाच्या काही महिला कार्यकर्त्यांनी एका क्लिनीकची तोडफोड केली. मग भाजपाच्या राज्यात भाजपाच्याच कार्यकर्त्यांना असुरक्षित असल्याचं वाटतंय का? भाजपाच्याच कार्यकर्त्यांना न्याय मिळताना दिसत नाही. पण तरीही अशा घटनांवर मुख्यमंत्री गप्प आहेत.

आता या घटनेबाबत शिवसेना ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेत संताप व्यक्त केला आहे. तसेच दीनानाथ मंगेशकर रुग्णालयावर राज्य सरकार काही कारवाई करणार आहे की नाही? राज्य सरकार हे रुग्णालय ताब्यात घेणार का? असे सवाल विचारत आमदार आदित्य ठाकरे यांनी राज्य सरकारवर टीका केली आहे."गेल्या दोन दिवसांपासून आंदोलन सुरु आहेत. दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात दुर्देवी घटना घडली. पण त्या कुटुंबाला न्याय मिळायला हवा. मला या घटनेत कोणतंही राजकारण आणायचं नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस जर त्यांच्या पक्षाच्या कार्यकर्त्यांना न्याय देऊ शकत नसतील तर सर्वसामान्य माणसांनी काय करायचं?", असा सवाल आदित्य ठाकरे यांनी विचारला आहे. पुण्यातील गर्भवती महिलेच्या मृत्यू प्रकरणात दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाने १० लाख रुपयांची मागणी केली होती. मग दीनानाथ मंगेशकर रुग्णालय प्रशासनाला राज्य सरकार काही जाब विचारणार आहे की नाही? जर मुख्यमंत्री सहाय्यता कक्षातून दीनानाथ मंगेशकर रुग्णालय प्रशासनाला किमान ५ फोन केले होते अशी माहिती सांगितली जाते. मग जर मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयातून रुग्णालय प्रशासनाला फोन जाऊन देखील ते दखल घेत नसतील तर त्या रुग्णालय प्रशासनाची ही मस्ती, मुजोरी सरकार उतरवणार आहे की नाही?", असा सवाल आदित्य ठाकरे यांनी केला. "दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या प्रशासनाला एवढी मस्ती का आहे? या रुग्णालयात ज्या काही गोष्टी आहेत, त्या सुधारण्यासाठी राज्य सरकार समोर येणार आहे की नाही? किंवा दीनानाथ मंगेशकर रुग्णालय सरकार ताब्यात घेणार का? तसेच या दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाचं महानगरपालिकेला किंवा आयकर विभागाला काही देणं आहे का? आता हे देखील तपासणं गरजेचं आहे", असं आदित्य ठाकरे यांनी म्हटलं आहे.

# जेव्हा नक्षलवादी मारला जातो!

## नक्षलग्रस्त छत्तीसगडमध्ये अमित शाहांचे मोठे विधान

। ओडिशा।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी शनिवारी छत्तीसगडमधील नक्षलग्रस्त म्हणून ओळख असलेल्या दंतेवाडा जिल्ह्याचा दौरा केला. यावेळी त्यांनी आदिवासी जमातीच्या बस्तर पंडुम या उत्सवात सहभागी होत आदिवासींना शुभेच्छा दिल्या. “नक्षलवादी हे आमचे बांधव आहेत. त्यांनी शस्त्र सोडून द्यावे आणि मुख्यप्रवाहात सामील व्हावे, असे मी त्यांना कळकळीची आवाहन करतो”, असेही अमित शाह यावेळी म्हणाले. संपूर्ण देश आणि बस्तर येथील डाव्या विचारांच्या कट्टरपंथीयांचा (LWE) नायनाट करण्यासाठी २६ मार्चची मुदत दिली होती, असेही त्यांनी पुन्हा एकदा सांगितले.**



“बस्तरमध्ये एकेकाळी गोळीबार आणि स्फोट होत होते, तो काळ आता गेला. आज शस्त्र असलेल्या आणि नसलेल्या अशा सर्वच नक्षलवाद्यांना माझे आवाहन आहे की, त्यांनी शस्त्र सोडून मुख्य प्रवाहात यावे. तुम्हीही आमच्यापैकी एक आहात. जेव्हा जेव्हा नक्षलवादी मारला जातो, तेव्हा आम्हाला आनंद होत नाही. कुणालाच होत नाही. या भागाला विकास हवा आहे. मागच्या ५० वर्षात या भागाला जे मिळाले नाही, ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ५ वर्षांत देऊ केले. पण बस्तरमध्ये शांतता नांदली तरच हे शक्य होणार आहे”, असे प्रतिपादन अमित शाह यांनी केले.अमित शाह पुढे म्हणाले, “बस्तरमधील मुले शाळेत जातील, इथल्या मातांच्या आरोग्याची काळजी घेतली जाईल. आदिवासी मुलांमध्ये कुपोषणाची समस्या उरणार नाही. शिक्षण, आरोग्य अशा सुविधा गावात उपलब्ध होतील. तालुका पातळीवर रुग्णालय उभारता येईल. तसेच प्रत्येक कुटुंबाला प्रति महिना सात किलो तांदूळ, आधार कार्ड, रेशन कार्ड आणि आरोग्य विमा दिला जाईल. हे तेव्हाच होऊ शकते, जेव्हा बस्तर नक्षलमुक्त होईल.”नक्षलमुक्त अभियानाची माहिती देताना अमित शाह म्हणाले की, जे जे गाव स्वतःला नक्षलमुक्त असल्याचे घोषित करतील त्या गावांच्या विकासासाठी एक कोटींचा निधी दिला जाईल. त्यामुळे तुमच्या गावातील नक्षलवाद्यांना आता आत्मसमर्पण करण्यास सांगा, असे आवाहन अमित शाह यांनी केले. ज्या नक्षलवाद्यांनी शस्त्र टाकले (आत्मसमर्पण) त्यांना विकासाचा अर्थ कळला आहे. आज आपल्या बंदूक नको तर संगणक हवे आहेत. बॉम्ब नको तर पेन हवा आहे. २०२५ च्या पहिल्या तीन महिन्यात ५२१ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे. तर मागच्या वर्षी ८८१ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले, अशी माहितीही त्यांनी दिली.“बस्तरमध्ये एकेकाळी गोळीबार आणि स्फोट होत होते, तो काळ आता गेला. आज शस्त्र असलेल्या आणि नसलेल्या अशा सर्वच नक्षलवाद्यांना माझे आवाहन आहे की, त्यांनी शस्त्र सोडून मुख्य प्रवाहात यावे. तुम्हीही आमच्यापैकी एक आहात. जेव्हा जेव्हा नक्षलवादी मारला जातो, तेव्हा आम्हाला आनंद होत नाही. कुणालाच होत नाही. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी शनिवारी छत्तीसगडमधील नक्षलग्रस्त म्हणून ओळख असलेल्या दंतेवाडा जिल्ह्याचा दौरा केला. यावेळी त्यांनी आदिवासी जमातीच्या बस्तर पंडुम या उत्सवात सहभागी होत आदिवासींना शुभेच्छा दिल्या. त्यांनी शस्त्र सोडून द्यावे आणि मुख्यप्रवाहात सामील व्हावे, असे मी त्यांना कळकळीची आवाहन करतो”, असेही अमित शाह यावेळी म्हणाले.

### त्या गावांना एक कोटी रुपये मिळणार

संपूर्ण देश आणि बस्तर येथील डाव्या विचारांच्या कट्टरपंथीयांचा (LWE) नायनाट करण्यासाठी २६ मार्चची मुदत दिली होती, असेही त्यांनी पुन्हा एकदा सांगितले. या भागाला विकास हवा आहे. मागच्या ५० वर्षात या भागाला जे मिळाले नाही, ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ५ वर्षांत देऊ केले. पण बस्तरमध्ये शांतता नांदली तरच हे शक्य होणार आहे”, असे प्रतिपादन अमित शाह यांनी केले.अमित शाह पुढे म्हणाले, “बस्तरमधील मुले शाळेत जातील, इथल्या मातांच्या आरोग्याची काळजी घेतली जाईल. आदिवासी मुलांमध्ये कुपोषणाची समस्या उरणार नाही. शिक्षण, आरोग्य अशा सुविधा गावात उपलब्ध होतील. तालुका पातळीवर रुग्णालय उभारता येईल.

---

# ‘वक्फ’ला संसदेत मंजुरी, न्यायालयात आव्हान

## काँग्रेसची याचिका, घटनात्मक तरतुदींच्या उल्लंघनाचा आरोप

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**बहुचर्चित वक्फ दुरुस्ती विधेयक लोकसभेपाठोपाठ राज्यसभेतही गुरुवारी रात्री दीर्घ चर्चेनंतर संमत करण्यात आले. परंतु दुसऱ्याच दिवशी या विधेयकाविरोधात काँग्रेस आणि ‘एमआयएम’ पक्षाने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. विधेयकाच्या वैधतेला दोन्ही पक्षांनी आव्हान देत त्यातून घटनात्मक तरतुदींचे उल्लंघन होत असल्याचा आरोप केला आहे.**




विधेयकातून ‘वक्फ’च्या मालमत्ता आणि त्यांच्या व्यवस्थापनावर मनमानी पद्धतीने निर्बंध लादण्यात आले आहेत. तसेच यात मुस्लीम समुदायाची धार्मिक स्वायत्तता कमी झाल्याचे काँग्रेस खासदार मोहम्मद जावेद यांनी वकील अनस तनवीर यांच्यामार्फत दाखल केलेल्या याचिकेत म्हटले आहे. प्रस्तावित कायदा हा इतर धार्मिक देणग्यांवर प्रशासनात नसलेले निर्बंध लादून मुस्लीम समुदायाविरुद्ध भेदभाव करत असल्याचेही याचिकेत नमूद केले आहे.बिहारच्या किशनगंज येथील खासदार असलेले जावेद हे या विधेयकावरील संयुक्त संसदीय समितीचे (जेपीसी) सदस्य होते. एखाद्याच्या धार्मिक प्रथेच्या कालावधीवर ‘वक्फ’ निर्बंध आणत असल्याचा आरोप त्यांनी याचिकेत केला आहे. अशा प्रकारचे निर्बंध इस्लामिक कायदा, प्रथा आणि प्रघातानुसार निराधार आहेत आणि कलम २५ अंतर्गत धर्मावर विश्वास ठेवणे आणि त्याचे पालन करण्याच्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन करत असल्याचेही त्यांनी याचिकेत म्हटले आहे.राज्यसभेत गुरुवारी १२ तासांच्या वादळी चर्चेनंतर मध्यरात्री २.३० वाजता वक्फ विधेयक मंजूर करण्यात आले. राज्यसभेत १२८ सदस्यांनी विधेयकाच्या बाजूने, तर ९५ सदस्यांनी विरोधात मतदान केले. तत्पूर्वी लोकसभेत बुधवारी मध्यरात्री २८८ विरुद्ध २३२ मतांनी हे विधेयक संमत करण्यात आले. आता हे विधेयक राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडे पाठवले जाणार असून, मुर्मू यांनी विधेयकावर स्वाक्षरी केल्यानंतर त्याचे कायद्यात रूपांतर होईल.ऑल इंडिया मुस्लीम पर्सनल लॉ बोर्डाने या विधेयकाविरुद्ध देशभरात निदर्शने करण्याचा इशारा ‘एक्स’ समाजमाध्यमावरून दिला आहे. ‘वक्फ दुरुस्ती विधेयकाबाबत सरकारची भूमिका खेदजनक आहे. ऑल इंडिया मुस्लीम पर्सनल लॉ बोर्ड लवकरच या विधेयकाविरोधात देशव्यापी निदर्शने आणि कायदेशीर पावले उचलेल’, असे ‘एआयएमपीएलबी’ने म्हटले आहे. वक्फ दुरुस्ती विधेयकाबाबत देशातील वातावरण असे आहे.

### विधेयकात अनेक त्रुटी आहेत

की, हे विधेयक अल्पसंख्याकांना त्रास देण्यासाठी आणले गेले आहे. लोकसभेत विधेयकाच्या बाजूने २८८ आणि विरोधात २३२ मते पडली. असे का झाले? याचा अर्थ विधेयकात अनेक त्रुटी आहेत. बहुचर्चित वक्फ दुरुस्ती विधेयक लोकसभेपाठोपाठ राज्यसभेतही गुरुवारी रात्री दीर्घ चर्चेनंतर संमत करण्यात आले.

# मनोज कुमार यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार



बॉलीवूड अभिनेते मनोज कुमार(MANOJ KUMAR) यांचे ४ एप्रिल २०२५ ला शुक्रवारी निधन झाले. वयाच्या ८७ व्या वर्षी मनोज कुमार यांनी अखेरचा श्वास घेतला. आज ५ एप्रिल २०२५ ला त्यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. मुंबईतील पवन हंस स्मशान घाटावर मनोज कुमार यांचे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्याचे काही व्हिडीओ सोशल मीडियावर पाहायला मिळत आहेत. त्यांचे पार्थिव त्यांच्या घरी आणण्यात आले होते. अनेक कलाकार त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी पोहोचले होते. मनोज कुमार यांची पत्नी शशी गोस्वामी यांचे अश्रू थांबत नसल्याचे काही व्हिडीओमध्ये दिसत आहे.सोशल मीडियावर मनोज कुमार यांच्या पत्नी शशी गोस्वामी यांचा एक व्हिडीओ पाहायला मिळत आहे, ज्यामध्ये त्या अत्यंत रडत असल्याचे दिसत आहे. एका बाजूने त्यांना त्यांच्या मुलाने धरले असून शशी गोस्वामी यांच्या हातात मनोज कुमार यांच्या पार्थिवाला घालण्यासाठी एक फुलांचा हार दिल्याचे पाहायला मिळत आहे. पती मनोज कुमार यांना अखेरचा निरोप देताना त्यांना अत्यंत दु:ख झाले. हा व्हिडीओ पाहिल्यानंतर अनेकांनी हळहळ व्यक्त केली आहे. त्यांचा मुलगादेखील भावूक झाल्याचे पाहायला मिळत आहे.मनोज कुमार यांचे बॉलीवूडमधील योगदान मोठे आहे. त्यांनी अभिनयाबरोबरच दिग्दर्शनही केले आहे. देशभक्तिपर आधारित त्यांनी अनेक चित्रपट निर्माण केले, त्यामुळे त्यांना भारत कुमार असे संबोधले जात असे. नील कमल, रोटी कपडा और मकान, पूरब और पश्चिम, क्रांती अशा अनेक चित्रपटांनी धुमाकूळ घातला. अशा चित्रपटांमुळे त्यांना मोठी लोकप्रियता मिळाली. जवळजवळ ५० वर्षे त्यांनी बॉलीवूडवर अधिराज्य गाजवले. त्यांच्या निधनानंतर मनोरंजनसृष्टीत हळहळ व्यक्त केली जात आहे.मनोज कुमार यांच्या अंत्यसंस्कारांसाठी बॉलीवूडमधील अनेक कलाकारांनी हजेरी लावली. सलीम खान, अमिताभ बच्चन, अभिषेक बच्चन, सुभाष घई, प्रेम चोप्रा असे अनेक कलाकार मनोज कुमार यांना अखेरचा निरोप देण्यासाठी पोहोचले होते. मनोज कुमार यांच्याबद्दल सुभाष घई म्हणाले, "ते आमच्यासाठी प्रेरणास्त्रोत होते.

# रितेश देशमुखचा दोन्ही मुलांसह जबरदस्त डान्स

रितेश देशमुख व त्याच्या कुटुंबाकडे 'आदर्श कुटुंब' म्हणून पाहिलं जातं. रितेश व त्याची पत्नी जिनिलीयाचे अनेक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत असतात. या जोडप्याने मराठीसह हिंदी कलाविश्वात एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. रितेश-जिनिलीयाची मुख्य भूमिका असलेला 'वेड' सिनेमा २०२२ च्या अखेरीस प्रदर्शित झाला होता. यामधील सगळीच गाणी सोशल मीडियावर व्हायरल झाली होती. रितेश देशमुखचा 'वेड' सिनेमा महाराष्ट्रात ब्लॉकबस्टर ठरला होता. हा जिनिलीयाचा पहिला मराठी चित्रपट होता. या सिनेमाच्या हटके लव्हस्टोरीला प्रेक्षकांनी अक्षरश: डोक्यावर घेतलं होतं. या सिनेमाने बॉक्स ऑफिसवर तब्बल ७५ कोटींहून अधिक कमाई केली होती.'वेड' सिनेमातलं 'मला वेड लावलंय!' गाणं सलमान खान आणि रितेश देशमुख यांच्यावर चित्रित झालं आहे. हे गाणं सिनेमा प्रदर्शित झाल्यापासूनच सर्वत्र चर्चेत आलं होतं. आता चित्रपट प्रदर्शित होऊन २ वर्षे उलटली असली तरी, आजही या गाण्याची लोकप्रियता कायम आहे. या गाण्यावर स्वत: रितेश देशमुखने ठेका धरल्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.'मला वेड लावलंय!' या गाण्यावर रितेश आपल्या दोन्ही मुलांसह जबरदस्त डान्स करताना दिसला. त्याची दोन्ही मुलं रियान आणि राहील आपल्या बाबाला पाहून 'मला वेड लावलंय!' गाण्याची हूकस्टेप करत होते. हा गोड फॅमिली व्हिडीओ 'MADOHOLIC' या इन्स्टाग्राम अकाऊंटवरून शेअर करण्यात आला आहे.रितेश व दोन्ही मुलं डान्स करत असताना जिनिलीया सुद्धा उपस्थित होती. तिने गोलकार फिरून हा सुंदर क्षण आपल्या मोबाईलमध्ये टिपला. जिनिलीया नवरा आणि मुलांचा एकत्र डान्स करतानाचा व्हिडीओ काढताना दिसली. रितेश-जिनिलीयाच्या या सुंदर बॉण्डिंगचं सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.दरम्यान, रितेश देशमुखच्या वर्कफ्रंटबद्दल सांगायचं झालं तर, सध्या अभिनेता 'राजा शिवाजी' सिनेमाच्या शूटिंगमध्ये व्यग्र आहे. या सिनेमाचं दिग्दर्शन रितेश स्वत: करतोय आणि या चित्रपटाची निर्मिती जिनिलीया देशमुख करणार आहे. या सिनेमाकडून प्रेक्षकांना मोठ्या अपेक्षा आहेत. याशिवाय, रितेशचे 'रेड २', 'हाऊसफुल ५' हे सिनेमे सुद्धा लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत.



# 'सिकंदर'च्या कमाईत मोठी घट

सध्या सलमान खानच्या 'सिकंदर' चित्रपटाची खूप चर्चा रंगली आहे आणि चर्चेचं कारण आहे प्रेक्षकांचा प्रतिसाद. 'सिकंदर' चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वी अनेक तर्क-वितर्क लावले जात होते. सलमान खानचा हा चित्रपट प्रदर्शित होताच चार दिवसांत १०० कोटींचा आकडा पार करेल किंवा २०२५मधील हा सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट ठरेल. पण, 'सिकंदर' प्रदर्शित झाल्यानंतरचं चित्र काहीस वेळ दिसत आहे. 'सिकंदर' चित्रपटाला पाहिजे तसा प्रेक्षकांचा प्रतिसाद मिळत नाहीये. अलीकडेच प्रदर्शित झालेल्या 'छावा' चित्रपटासारखी बक्कळ कमाई 'सिकंदर'ला करताना नाकीनऊ झाल्याचं दिसत आहे. ए.आर. मुरुगादॉस यांनी दिग्दर्शित केलेला 'सिकंदर' चित्रपट ३० मार्चला ईदच्या मुहूर्तावर प्रदर्शित झाला. २०० कोटींचं बजेट असलेला हा चित्रपट पहिल्या दिवशी देखील बॉक्स ऑफिसवर पाहिजे तशी कमाई करू शकला नाही. खूप मेहनतीने पहिल्या दिवशी 'सिकंदर' फक्त २६ कोटींची कमाई करू शकला. त्यानंतर कमाईत किंचित वाढ झाली. पण, पुढे मोठ्या प्रमाणात उतरती कळा पाहायला मिळाली.सॅकनिल्कच्या रिपोर्टनुसार, सलमान खानच्या 'सिकंदर' चित्रपटाच्या कमाईत गुरुवारच्या तुलनेत सहाव्या दिवशी शुक्रवारी दुप्पट घट झाल्याचं दिसत आहे. गुरुवारी 'सिकंदर' चित्रपटाने ६ कोटींची कमाई केली होती. पण शुक्रवारी 'सिकंदर' फक्त ३.७५ कोटींचा गल्ला जमवू शकला. जर विकी कौशलच्या 'छावा' चित्रपटाचं बोलायचं झालं तर, सहाव्या दिवशी या चित्रपटाने ३२ कोटींची कमाई केली होती आणि सहा दिवसांमध्ये एकूण कमाईचा आकडा १९७.७५ कोटी रुपये होता.

# रझा मुराद यांनी सांगितली राजेश खन्ना यांची आठवण

दिग्गज अभिनेते राजेश खन्नायांच्या चित्रपटांबाबत जितके बोलले जाते, तितकेच त्यांचे अनेक किस्से आजही सांगितले जातात. १९७२ साली हृषिकेश मुखर्जी यांच्या गाजलेल्या नमक हराम या चित्रपटाचे शूटिंग सुरू होते. या चित्रपटात त्या काळात लोकप्रिय असलेले राजेश खन्ना, नव्यानेच बॉलीवूडमध्ये आलेले अमिताभ बच्चन व रझा मुराद हे प्रमुख भूमिकेत होते. रझा मुराद व राजेश खन्ना या चित्रपटात जवळचे मित्र होते, त्यामुळे चित्रपटात राजेश खन्ना व ते एकमेकांना बंधू अशी हाक मारत असत. मात्र, प्रत्यक्षात जवळच्या मित्राची भूमिका रझा यांनी साकारल्याचा आनंद राजेश खन्ना यांना झाला नव्हता, कारण राजेश खन्ना यांना त्यांचा जवळचा मित्र विनोद शर्माला ही भूमिका मिळावी, असे वाटत होते. मात्र, हृषिकेश मुखर्जी यांनी त्यासाठी स्पष्टपणे नकार दिला होता.

# हुमा कुरैशीच्या ईद पार्टीत खिलाडी कुमारचा मुलगा



बॉलीवूडमधील स्टारकिड्स नेहमी चर्चेत असतात. या स्टारकिड्सचे फोटो, व्हिडीओ सोशल मीडियावर सतत व्हायरल होतं असतात. बऱ्याच स्टारकिड्सने झगमगत्या दुनियेत पदार्पण केलं आहे. असे काही स्टारकिड्स आहेत, ज्यांनी दुसरा मार्ग निवडला आहे. पण, हे स्टारकिड्स खूप लोकप्रिय आहेत. त्यापैकी एक म्हणजे अक्षय कुमार आणि ट्विंकल खन्नाचा मुलगा आरव कुमार. अक्षय कुमार आणि ट्विंकल खन्ना यांची दोन्ही मुलं माध्यमापासून दूर असतात. पण, आरव जिथे जातो, तिथे तो पापराझींच्या कॅमेरात कैद होतोच. सध्या आरवचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर खूप व्हायरल झाला आहे. या व्हिडीओमध्ये आरव एका मिस्ट्री गर्लसह पाहायला मिळत आहे. नुकताच आरव कुमार हुमा कुरैशीच्या ईद पार्टीत सहभागी झाला होता. यावेळी आरवच्या लूकने सगळ्यांची मनं जिंकली. त्याने काळ्या रंगाचा कुर्ता घातला होता. यामध्ये आरव खूपच सुंदर दिसत होता. यावेळी आरवबरोबर दिसणाऱ्या मिस्ट्री गर्लने सगळ्यांचं लक्ष वेधून घेतलं. आरव ज्या गाडीतून प्रवास करत होता, त्याच गाडीत त्याच्या बाजूला मिस्ट्री गर्ल पाहायला मिलाली. लाल रंगाच्या ड्रेसमध्ये ही मिस्ट्री गर्ल खूपचं सुंदर दिसत होती. आरव आणि त्याच्या मिस्ट्री गर्लचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर खूप चर्चेत आला आहे. या मिस्ट्री गर्लबाबत जाणून घेण्यासाठी नेटकरी खूपच उत्सुक आहेत.दरम्यान, एका मुलाखतीमध्ये अक्षय कुमारने अभिमानने सांगितलं होतं की, आरवला चित्रपटांहून जास्त फॅशन डिझाइन खूप आवडतं.

# दिल्लीचा चेपॉकवर ऐतिहासिक विजय!

## अक्षर पटेलच्या संघाची आयपीएल 2025मध्ये विजयाची हॅटट्रिक

| नवी दिल्ली |
प्रतिनिधी : महाईन्यूज |

**दिल्ली कॅपिटल्सच्या संघाने बलाढ्य चेन्नई सुपर किंग्सचा २५ धावांनी मोठा पराभव केला आहे. यासह दिल्ली कॅपिटल्सने विजयाची हॅटट्रिक साधली आहे. चेन्नई सुपर किंग्स संघाला त्यांच्या घरच्या मैदानावर पुन्हा एकदा मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले आहे. दिल्ली कॅपिटल्स संघाने या विजयासह १५ वर्षांनंतर चेपॉकच्या मैदानावर विजयाची नोंद केली.**



दिल्लीने दिलेल्या १८४ धावांचा पाठलाग करताना चेन्नईचा संघ २० षटकांत ५ विकेट्स गमावत १५८ धावा केल्या.दिल्ली कॅपिटल्सने अष्टपैलू कामगिरी करत चेन्नईला पराभवाचा दणका दिला. यासह दिल्लीने यंदाच्या मोसमात विजयाची हॅट्रिक नोंदवून गुणतालिकेत पहिले स्थान गाठले. त्याचवेळी चेन्नईला सलग तिसऱ्या पराभवाला सामोरे जावे लागले आहे. धोनीसाठी हा सामना देखील खास होता कारण पहिल्यांदाच धोनीचे आई-वडील त्याला पाहण्यासाठी स्टेडियममध्ये आले होते, पण त्यांच्यासमोर धोनीला संघासाठी विजयी कामगिरी करता आली नाही. चेपॉकवर झालेल्या या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत १८३ धावा केल्या. दिल्लीसाठी, त्यांचा नवा स्टार खेळाडू केएल राहुलला यावेळी सलामीला उतरावे लागले, कारण सलामीवीर फाफ डू प्लेसिस दुखापतीमुळे सामना खेळणार नव्हता. राहुलने या संधीचा फायदा घेत कठीण परिस्थितीतही उत्कृष्ट अर्धशतक झळकावले.चेपॉकवर झालेल्या या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत १८३ धावा केल्या. दिल्लीसाठी, त्यांचा नवा स्टार खेळाडू केएल राहुलला यावेळी सलामीला उतरावे लागले, कारण सलामीवीर फाफ डू प्लेसिस दुखापतीमुळे सामना खेळणार नव्हता. राहुलने या संधीचा फायदा घेत कठीण परिस्थितीतही उत्कृष्ट अर्धशतक झळकावले. राहुलने ५१ चेंडूत ६ चौकार आणि ३ षटकारांच्या मदतीने ७७ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. त्याच्याशिवाय अभिषेक पोरेलने झटपट ३३ धावा केल्या, तर ट्रिस्टन स्टब्स, कर्णधार अक्षर पटेल आणि समीर रिझवी यांनीही महत्त्वपूर्ण योगदान दिले. यासह संघाने १८३ धावांचा टप्पा गाठला.अखेरच्या षटकांमध्ये मथीशा पथिरानाने दिल्लीच्या धावसंख्येवर अंकुश ठेवत मोठी धावसंख्या करण्यापासून रोखले, पण सीएसके संघाचे फलंदाज मात्र ही धावसंख्या गाठण्यातही अपयशी ठरले. खलील अहमदने २ विकेट्स तर जडेजा, नूर अहमद, मथीशा पथिराना यांनी प्रत्येकी १-१ विकेट घेतली.चेन्नईने २०१९ पासून, आयपीएलमध्ये १८० पेक्षा जास्त धावांचे लक्ष्य गाठले नाही. संघाचा हा ट्रेंड यावेळीही कायम राहिला. पॉवरप्लेमध्ये पुन्हा एकदा संघाची सुरुवात खराब झाली आणि नवीन सलामीची जोडीही काही चांगली कामगिरी करू शकली नाही. संघाने अवघ्या ६ षटकांत ३ गडी गमावले होते, तर ११ व्या षटकापर्यंत संघाने७४ धावांत ५ विकेट्स गमावले. चेन्नईचा प्रत्येक फलंदाज धावांसाठी झुंज देताना दिसला. धोनी आणि विजय शंकर दोघेही मैदानावर खेळताना मोठे फटके खेळण्यासाठी झगडताना दिसले.तिसऱ्या षटकात क्रीजवर आलेला विजय शंकर पहिल्याच चेंडूपासून धावांसाठी झगडताना दिसला आणि त्याच्या सर्वोत्तम प्रयत्नानंतरही त्याच्या बॅटमधून एकही मोठा शॉट पाहायला मिळाला नाही. दरम्यान त्याला तीन वेळा जीवदान मिळाले. त्यानंतर एमएस धोनी ११व्या षटकात मैदानात आला. पण धोनीही धावांसाठी झगडताना दिसला. मात्र हे दोन्ही फलंदाज संघाला आवश्यक ती गती देऊ शकले नाहीत.

### मुकेश कुमारने 1-1 विकेट घेतली

फिनिशर धोनीने २६ चेंडूत १ चौकार आणि १ षटकारासह ३० धावा केल्या. दिल्लीने दुसऱ्या डावात उत्कृष्ट गोलंदाजी चेन्नईच्या फलंदाजांना धावा करण्याची संधी दिली नाही. दिल्लीकडून फिरकीपटू विपराज निगमने शानदार गोलंदाजी करत २७ धावा देत २ विकेट्स घेतले. तर कुलदीप, स्टार्क, मुकेश कुमारने १-१ विकेट घेतली.दिल्लीने दिलेल्या १८४ धावांचा पाठलाग करताना चेन्नईचा संघ २० षटकांत ५ विकेट्स गमावत १५८ धावा केल्या.दिल्ली कॅपिटल्सने अष्टपैलू कामगिरी करत चेन्नईला पराभवाचा दणका दिला. यासह दिल्लीने यंदाच्या मोसमात विजयाची हॅट्रिक नोंदवून गुणतालिकेत पहिले स्थान गाठले. त्याचवेळी चेन्नईला सलग तिसऱ्या पराभवाला सामोरे जावे लागले आहे. धोनीसाठी हा सामना देखील खास होता कारण पहिल्यांदाच धोनीचे आई-वडील त्याला पाहण्यासाठी स्टेडियममध्ये आले होते, पण त्यांच्यासमोर धोनीला संघासाठी विजयी कामगिरी करता आली नाही.

# “सर, तुमच्याकडे लॉर्ड असताना चिंता कसली?

## रोहित शर्माने शार्दुलचं नाव घेत संजीव गोयंकाना विचारला प्रश्न

| नवी दिल्ली |
प्रतिनिधी : महाईन्यूज |

**लखनौ सुपर जायंट्स संघाने मुंबई इंडियन्सला पराभूत करत संघाविरूद्धचा रेकॉर्ड कायम ठेवला आहे. लखनौने घरच्या मैदानावर मुंबई इंडियन्सचा १२ धावांनी पराभव केला. मुंबईचा माजी कर्णधार रोहित शर्मा गुडघ्याच्या दुखापतीमुळे या सामन्यात खेळला नव्हता. पराभवानंतर माजी कर्णधार रोहित शर्मा लखनऊचे मालक संजीव गोयंका यांच्याशी बोलताना दिसला. दोघांमधील संवादाचा व्हिडिओ समोर आला आहे.**




शार्दुल ठाकूरने लखनौसाठी संघात दाखल झाल्यापासून उत्कृष्ट कामगिरी केली आहे. मुंबई इंडियन्सविरूद्धच्या सामन्यात शार्दुलने भले एक विकेट घेतली असली पण त्याच्या १९व्या षटकातील गोलंदाजीमुळे सामना फिरला. मुंबईला विजयासाठी २ षटकांत २२ धावांची गरज होती. शार्दुलला १९वे षटक टाकण्याची जबाबदारी दिली. शार्दुलने भेदक गोलंदाजी करत या षटकात एकही बाऊंड्रीची संधी दिली नाही. परिणामी त्याने या षटकात फक्त ७ धावा दिल्या.शार्दुलच्या या उत्कृष्ट षटकामुळे लखनौचा विजय जवळपास निश्चित झाला होता. शार्दुल ठाकूर लखनौच्या संघात बदली खेळाडू म्हणून सामील झाला होता. शार्दुल ठाकूर आयपीएल २०२५ च्या लिलावात अनसोल्ड राहिला होता. पण जेव्हा लखनौचे २-३ वेगवान गोलंदाज दुखापतीमुळे संघाबाहेर झाल्याने लखनौने त्याला बदली खेळाडू म्हणून संघात सामील केले. पहिल्याच सामन्यापासून शार्दुलने आपल्या कौशल्याच्या आणि भेदक गोलंदाजीच्या जोरावर संघासाठी उत्कृष्ट गोलंदाजी केली. याचबरोबर तो संघाचा महत्त्वाचा गोलंदाजही बनला आहे.रोहित शर्माने मुंबईविरूद्धच्या सामन्यानंतर ऋषभ पंत आणि संजीव गोयंका यांच्याशी बराच वेळ चर्चा करताना दिसले. दरम्यान लखनौचे मालक आपल्या संघाचा कर्णधार पंतच्या पाठीवर थाप देत शाबासकी दिली. एलएसजीने याचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर केला आहे. पोस्ट केलेल्या व्हिडीओमध्ये रोहित संजीव गोयंका यांना म्हणतो “सर, तुमच्याकडे लॉर्ड असताना चिंता कसली?”सामन्यापूर्वीही रोहित आणि शार्दुलमध्ये मजेशीर संवाद पाहायला मिळाला. रोहित शर्मा सामन्यापूर्वी सरावादरम्यान लखनौच्या खेळाडूंना भेटण्यासाठी जात असतो. तितक्यात शार्दुल सराव थांबवत आणि म्हणतो.

### हा स्वत:ला द लॉर्ड म्हणतोय

“थांब थांब रोहित शर्मा मैदानात फक्त एकाच व्यक्तीला भेटण्यासाठी येतो, तो म्हणजे लॉर्ड”. तितक्यात रोहितला शार्दुल हात मिळवत गळाभेट घेतो, हे ऐकताच रोहित म्हणतो, “हा स्वत:ला द लॉर्ड म्हणतोय...शार्दुलही हसू लागतो.रोहित शर्माने मुंबईविरूद्धच्या सामन्यानंतर ऋषभ पंत आणि संजीव गोयंका यांच्याशी बराच वेळ चर्चा करताना दिसले.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

। रविवार ।

। दि. 6 एप्रिल 2025।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## “टेक्निऑन 2025” या उपक्रमाचे उद्घाटन

# नवकल्पनांना व्यवहारिक जोड द्या- अस्मिता एम.

### शिक्षण विश्व: 966 विद्यार्थ्यांनी विविध अभियांत्रिकी शाखांतून सहभागी

। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**संशोधन व तंत्रज्ञानाचा वेगाने होणारा विकास, विविध उद्योगांवरील त्याचा परिणाम, शासन व उद्योजकांचे त्याबाबत धोरण हे सर्व आत्मसात करून विद्यार्थ्यांनी आपल्या नवकल्पनांना व्यवहारिक जोड देऊन आपल्या कौशल्यांचा उपयोग समाजहितासाठी करावा असे मार्गदर्शन अस्मिता एम. यांनी केले.**




पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) साते, वडगाव मावळ येथील पिंपरी चिंचवड विद्यापीठ (पीसीयु) येथे “टेक्निऑन २०२५” या उपक्रमाचे उद्घाटन प्रसंगी अस्मिता एम. बोलत होते. या टेक्निऑन मध्ये ९६६ विद्यार्थ्यांनी विविध अभियांत्रिकी शाखांतून सहभागी होऊन १८८ प्रोजेक्ट्स, पोस्टर्स आणि मॉडेल्स चे सादरीकरण केले. आर्टिफिशियल इंटेलिजन्स, रोबोटिक्स, सस्टेनेबिलिटी आणि सॉफ्टवेअर डेव्हलपमेंटसारख्या विविध क्षेत्रांचा समावेश असलेल्या प्रकल्पांचे सादरीकरण केले.

यावेळी पीसीयूच्या कुलगुरू डॉ. मणिमाला पुरी, प्र - कुलगुरू डॉ. सुदीप थेपडे, इंडस्ट्रियल इंजिनिअरिंग दुबई चे प्रा. डॉ. अमोल गोरे, एसओइएनटी विभागप्रमुख डॉ. रामदास बिरादार आदी उपस्थित होते.

यावेळी डॉ. अमोल गोरे यांनी शैक्षणिक व औद्योगिक अनुभवातून इंडस्ट्रियल इंजिनिअरिंगमधील प्रक्रियांचे ऑप्टिमायझेशन, समस्यांचे निराकरण करण्यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व जागतिक अभियांत्रिकीतील बदल समजून घेण्यास सांगितले. विद्यार्थ्यांनी भौगोलिक व तांत्रिक सीमारेषा ओलांडून आपल्या स्वप्नांचा पाठपुरावा करून आपले करिअर घडवावे असे सांगितले.

पिंपरी चिंचवड विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मणिमाला पुरी यांनी सांगितले की, टेक्निऑन मधील उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आपली प्रतिभा आणि संशोधन प्रख्यात अशा प्राध्यापक व उद्योग तज्ज्ञांसमोर मांडण्याची संधी मिळते.

विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाच्या प्रगतीमध्ये आपले योगदान देण्यासाठी हे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. “टेक्निऑन २०२५” हे आमच्या विद्यार्थ्यांच्या प्रतिभेचे आणि सर्जनशीलतेचे जिवंत उदाहरण आहे, असे डॉ. रामदास बिरादार यांनी सांगितले.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी सहभागी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

# उत्कृष्ट काम हीच आपली ओळख - कविता कडू पाटील

### शिक्षण विश्व: स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळाचा 31 वा संस्था वर्धापन दिन

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**आपली आवड जोपासून ती कामांमध्ये उतरवा. आपले काम सर्वोत्कृष्ट झाल्याशिवाय राहणार नाही, आपले काम हीच आपली ओळख बनत असते असे मत स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळाच्या व्यवस्थापकीय संचालिका कविता कडू पाटील यांनी व्यक्त केले.**



स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळाच्या 31 व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात कविता कडू पाटील बोलत होत्या. या निमित्ताने संस्थेचे अध्यक्ष विनायक भोंगाळे, विश्वस्त सरिता विखे पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली भागवत, सर्व मुख्याध्यापक- उपमुख्याध्यापक, सर्व कार्यकारणी सदस्य, सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते. कविता कडू पाटील यावेळी म्हणाल्या, संस्था अध्यक्ष विनायक भोंगाळे यांनी १९९४ साली लावलेल्या इवल्याश्या रोपट्याचा आज एवढा मोठा वटवृक्ष झाला आहे. आता संस्थेच्या शाखा वाढल्या आहेत. त्यांच्या ध्येयवेड्या चिकाटीमुळे हे शक्य झाले. त्यापुढे म्हणाल्या आपली आवड जोपासून ती कामांमध्ये उतरवा. आपले काम सर्वोत्कृष्ट झाल्याशिवाय राहणार नाही, आपले काम हीच आपली ओळख बनत असते. यासाठी नवनवीन लोकांसोबत जोडले जाणे. त्यांच्याकडून नवीन गोष्टी शिकून त्या अमलात आणणे गरजेचे आहे. वर्धापन दिनाच्या निमित्ताने शाळेच्या नवीन इमारतीचा आराखडा कार्यक्रमामध्ये दाखविण्यात आला. हा आराखडा सर्व शिक्षकांसाठी संस्थेच्या वाढदिवशी मिळालेली ही सुंदर भेट ठरली असल्याचे यावेळी कविता कडू पाटील यांनी नमूद केले.

#### विद्यार्थ्यांच्या विकासाला विशेष प्राधान्य

संस्थाध्यक्ष विनायक भोंगाळे आपल्या भाषणामध्ये म्हणाले की, आपण आणखी नवनवीन योजना सुरू करणार आहोत, ज्यामध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला विशेष प्राधान्य दिले जाईल.

# Moaraya Shikshan Sanstha Computer Vacation Batch 2024-25

ADMISSION OPEN

**Second Batch**
From 5th April 2025
Duration One Month
1 Hour /day
Monday to Saturday

For
10th std Students,
12th std students,
parents,
others school students

'C' Language
Fees: 1300/-

Corel Draw
Fees: 1100/-

'C++' Language
Fees: 1300/-

Adobe Photoshop
Fees : 1100/-



Basic Java
Fees : 1300/-

Basic Tally
Fees : 1500

Scratch Animation
Fees : 1300/-

M.S. Office
Fees : 1500/-

Contact: 8087706100/ Computer Lab
Registration started
Venue: Computer Lab, V. K. Mate Highschool

Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI

2025-26
ADMISSIONS
OPEN

**PRIYADARSHANI**
SCHOOL, ALANDI

**42** YEARS OF ENRICHING EXPERIENCE IN EDUCATION

**50** FIFTY PLUS NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS SCHOOLS

Contact Us Now
86687 55826
98232 31705

Wadgoan road, Sr.no. 98,
Opposite Ram Mandir,
Alandi 412105





Late Babanrao Gabaji Gawali Charitable Trust's
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JUNIOR COLLEGE
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JR. COLLEGE
WE MAKE YOUR FUTURE
Powered by
JAI HIND EDUTECH
CBSE Affiliation No. : 1130741 • UDISE Code - 27252001012
BHOSARI CAMPUS : Sr. No. 203, Nr. Durwankur Lawns, Alandi Road, Bhosari, Pune-411039 (Maharashtra)
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL
ADMISSION
OPEN
2025-2026
Pre Primary to Class XII
LIMITED SEATS
Hurry up!!!
Bi-focal / Technical / Vocational Subject are available
For Science Stream
• Computer Science
• Crop Science
• Electronics
• Mechanical / Technical Automobile
• Information Technology (IT)
For Commerce Stream
• Banking
• Marketing & Sales
• Office Management
• Small Industries & Self employment
• Information Technology (IT)
CALL NOW : 9763441639 / 8657473241


MASTER MIND GLOBAL
SCHOOL & Jr. College
(CBSE)
( Since 2013)
ADMISSIONS
OPEN FOR
NURSERY TO 12TH
Where There is
Creativity, There is
Master Mind
STAR
RANKING
Excellence in Education & Disciplined Environment
Co-Curricular & Extra Curricular Activities
Guaranteed Safety & Security
A++ Grade
In Leadership & Quality
Management
Contact : +91 7218125125
E-mail : mastermindglobalschool.com
Website : www.http://mastermindglobalschool.com


BLOSSOM YOUR KNOWLEDGE
TOMORROW'S
LEADERS
ARE MADE HERE
ADMISSIONS OPEN FOR 2025-26
CBSE Curriculum,
Aligned with NEP & NCF
Ambitious Projects
like 'Read-to-Lead'
Legacy of
100% Results
Gayatri English Medium School
& Jr. College
779 676 7292
BRANCHES AT: DHANORE | CHARHOLI | MOSHI

KAMALA EDUCATION SOCIETY'S

# PRATIBHA INSTITUTE OF BUSINESS MANAGEMENT

KAMALA Education Society

**AICTE Permanent ID: 1-3675161 | DTE Code: 6167**

Approved by AICTE | B+ NAAC Accredited | Permanently Affiliated to Savitribai Phule Pune University

## ADMISSIONS OPEN

Full Time Undergraduate Courses (3 Years Degree Course, 4 Years Honours)



**BBA**

**Bachelor of Business Administration**



**BCA**

**Bachelor of Computer Applications**

### Highlights:

- Advanced Industrial and Research Learning
- Proven Track Record of Placements
- Mentoring and Seed Funds for Startups
- Skill Development and Certification Courses
- Live Industrial Projects
- Earn and Learn Scheme of Rs. 10,00,000+
- Govt. and Management Scholarships
- State of the Art infrastructure
- ICT enabled classrooms

Eligibility: Passed HSC Examination with any stream

**Call for more details:**

**BBA : Prof. Gururaj - 8624991767 | Dr. Pallavi - 9225635556**

**BCA : Prof. Manish - 9823223336 | Prof. Surabhi - 9049004895**

www.pibmpune.org.in

Scan QR code to know more